| | | |
|---|---|---|
| ३ | पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र पाठ्यक्रम.<br>(भेषजी अधिस्नातक)<br>(एम.फार्म.) | (१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी असणारे उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) त्याने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून किंवा भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संस्थेमधून औषधनिर्माणशास्त्रामधील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात त्याने किमान ५५ टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गाच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्याबाबतीत किमान ५० टक्के गुण) मिळवलेले असावेत ;<br>(तीन) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या पदवीधर औषधनिर्माणशास्त्र अभियोग्यता चाचणी (GPAT) या परीक्षेत नॉन झिरो पॉझिटीव प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे.<br>(चार) प्रायोजित उमेदवारांचे बाबतीत, उमेदवारास एखादी नोंदणीकृत भागीदारी संस्था /कंपनी / उद्योग/ शैक्षणिक आणि/किंवा संशोधन संस्था अशा ठिकाणी किंवा शासनाची स्वायत्त संस्था किंवा शासनाचा विभाग अशा ठिकाणी ज्या विषयामध्ये प्रवेश मागण्यात येत असेल त्या संबंधित विषयातील,अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरचा कमीत कमी दोन वर्षांचा पूर्ण वेळ कामाचा अनुभव असला पाहिजे.<br>(२) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तीची, आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,—<br>(एक) उमेदवाराने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही संस्थेमधून औषधनिर्माणशास्त्रामधील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात त्याने किमान ५५ टक्के गुण मिळवलेले असावेत ;<br>(दोन) समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा. |
| ४ | पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पाठ्यक्रम<br>(अभियांत्रिकी अधिस्नातक)<br>(एम.ई./ एम. टेक.) | (१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी असणारे उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान च्या संबंधीत शाखेतील स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा किंवा औषधनिर्माणशास्त्र किंवा वास्तुशास्त्र पाठ्यक्रमातील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्याने किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ मागासवर्ग प्रवर्गांच्या आणि विकलांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत किमान ४५ टक्के गुण) मिळवलेले असावेत ; |

| | | |
|---|---|---|
| | | (तीन) उमेदवाराने ज्या पाठयक्रमासाठी प्रवेश मागितलेला असेल त्या संबंधीत विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी पाठयक्रमाला प्रवेश देण्यासाठीच्या पात्रता निकषांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अभियांत्रिकीच्या किंवा तंत्रज्ञानाच्या किंवा औषधनिर्माणशास्त्र किंवा वास्तुशास्त्र संबंधित पाठयक्रमातील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केली असली पाहिजे ;<br>(चार) भारतीय प्रोद्योगिकी संस्थेद्वारे आयोजित पदवीधर अभियांत्रिकी अभियोग्यता चाचणी (GATE) परीक्षेमध्ये नॉन झिरो पॉझिटीव प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे ; **किंवा**<br>(चार) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या पदवीधर औषधनिर्माणशास्त्र अभियोग्यता चाचणी (GPAT) या परीक्षेत नॉन झिरो पॉझिटीव प्राप्तांक मिळवलेला असला पाहिजे ; **किंवा**<br>(चार) प्रायोजित उमेदवारांचे बाबतीत, उमेदवारास एखादी नोंदणीकृत भागीदारी संस्था /कंपनी / उद्योग/ शैक्षणिक आणि/किंवा संशोधन संस्था अशा ठिकाणी किंवा शासनाची स्वायत्त संस्था किंवा शासनाचा विभाग अशा ठिकाणी ज्या विषयामध्ये प्रवेश मागण्यात येत असेल त्या संबंधित विषयातील , अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरचा कमीत कमी दोन वर्षांचा पूर्ण वेळ कामाचा अनुभव असला पाहिजे.<br><br>(२) अनिवासी भारतीय / भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती / भारतीय वंशाच्या व्यक्तीची , आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी नागरिक,—<br>(एक) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान च्या संबंधीत शाखेतील स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा किंवा औषधनिर्माणशास्त्र किंवा वास्तुशास्त्र पाठ्यक्रमातील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्याने किमान ५० टक्के गुण मिळवलेले असावेत ;<br><br>(दोन) उमेदवाराने ज्या पाठयक्रमासाठी प्रवेश मागितलेला असेल त्या संबंधीत विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी पाठयक्रमाला प्रवेश देण्यासाठीच्या पात्रता निकषांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अभियांत्रिकीच्या किंवा तंत्रज्ञानाच्या किंवा औषधनिर्माणशास्त्र किंवा वास्तुशास्त्र संबंधित पाठयक्रमातील स्नातक पदवी परीक्षा उत्तीर्ण केली असली पाहिजे ;<br>(तीन) समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी घोषित केलेली प्रवेशासाठीची इतर आवश्यक पात्रता धारण करत असावा. |
| ५ | पदव्युत्तर पदवी वास्तुशास्त्र पाठ्यक्रम<br>(वास्तुशास्त्र अधिस्नातक)<br><br>(एम.आर्च.) | (१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार आणि अखिल भारतीय उमेदवारी असणारे उमेदवार,—<br>(एक) उमेदवार भारतीय नागरिक असला पाहिजे ;<br>(दोन) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा वास्तूशास्त्र परिषदेने किंवा केंद्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून वास्तुशास्त्रामधील स्नातक पदवी परीक्षा किंवा त्यास समतुल्य परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्यात त्याने किमान ५० टक्के गुण (महाराष्ट्र राज्यातील आहेत अशाच केवळ |